# नजरेचा नजराणा

तान्हुल्याच्या नजरेने
देव पहातो
बाळाच्या नजरेत
निसर्ग डरोकावतो

दृष्टी सर्वांसाठी..

आईची नजर
आशीर्वादाची श्रीमंती
वडिलांची नजर
शिस्तबध्द करडी

भावाचा स्नेह
नजरेतून उमलतो
बहिणीच्या ओवाळणीत
तो नजरबंद होतो

नजरेला नजर मिळते जेव्हा
'ती'ची नजर लाजते तेंव्हा
प्रीतीचा मधुरंग उमलू लागतो
हृदयाच्या कुपीत तो कस्तुरी होतो

आजीच्या नजरेत
मायाळू लोणी
आजोबा सांगतात
गुज–गोष्टी– गाणी

'नजरे'ची ही भेट
नजराणा जणू
सर्वांच्या साक्षीने
नेत्रदान करु!

–डॉ.सौ.सुधा कांकरिया

साईसूर्य नेत्रसेवा
संशोधन आणि प्रशिक्षण